Vol 4 Issue 1 March 2014
Impact Factor : 2.1506(UIF)
ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 2.1506(UIF)**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-1 | Feb-2014
Available online at www.isrj.net

# "महाविद्यालयीन विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका – एक अभ्यासविषयक दृष्टिकोण"

**अशोक नागप्पा उपासे**

प्रमुख,राज्यशास्त्र विभाग
कमंवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,पंढरपूर

***प्रस्तावनाः–***

नव्वदीच्या दशकात कायद्याद्वारे बंद करण्यात आलेल्या विद्यार्थी संसदेच्या थेट निवडणुका पुन्हा सकारात्मक भूमिका स्विकारून, राज्यशासनाने त्या सुरू करण्याचे संकेत दिले आहेत. मागील दोन–तीन वर्षापासून हे घडून यावे म्हणून प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीस या अनुषंगाने चर्चा सुरू होते. विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका घ्याव्यात, की घेऊ नयेत, याबाबत अनुकूल व प्रतिकूल अशी मते मांडली जात आहेत. पण ही सर्व चर्चा ऑक्टोबर महिना उजाडला की, पुढील वर्षाच्या जून महिन्यापर्यंत बंद झालेली असते. हाच आपल्या सर्वांचा अनुभव आहे.

***विद्यार्थी संसदेच्या निवडणुका घेण्यामागील मूळ उद्देशः–***

१. विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचे स्वत:चे एक व्यासपीठ असावे.
२. शैक्षणिक गुणवत्तेबाबत महाविद्यालयीन व विद्यापीठातील पायाभूत सुविधाबाबत, शैक्षणिक प्रक्रियेत येवू पाहणाऱ्या नव्या प्रवाहाबाबत विचार–विनिमय करुन ठोस निर्णय घेऊन, त्याद्वारे आपली भूमिका या स्तरावरील प्रशासनापुढे मांडली जावी.
३. विद्यार्थीमंडळ व निवडणुक प्रक्रिया म्हणजे विद्यार्थ्यांच्या भविष्यकालीन गुणात्मक राजकीय सहभागाचे प्रशिक्षण देणारी कार्यशाळाच होय. यातून तयार झालेले विद्यार्थी नेते भारतीय लोकशाहीचे आधारस्तंभ ठरावेत.
४. लोकशाहीत सामाजिक व राष्ट्रीय गुणात्मकतेनुसार होणाऱ्या निवडणुकांना अत्यंत महत्त्व असते. याची जाणीव विद्यार्थी दशेतच त्यांना व्हावी आणि त्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी संक्रीय व्हावे. म्हणून विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका, निवडणुकीतील उमेदवारी, निवडणूक प्रक्रिया, निवडूण आलेले विद्यार्थी प्रतिनिधी व त्यांचे अधिकार आणि कार्ये त्यांना माहित व्हावीत.
५. या स्तरावरील विद्यार्थी मंडळाच्या नेत्यानी विद्यार्थांचे प्रश्न सोडविण्यासाठी महाविद्यालयाच्या प्रशासनाकडे आपली भूमिका मांडावी, त्यासाठी योग्य मार्गाने आग्रह धरावा. – असा या निवडणूका मागील उद्दात्त हेतू आहे. – या प्रक्रियेतून तयार होणारे सर्वच विद्यार्थी नेते राजकीय नेतृत्व करु शकले नाहीत, तरी दैनंदिन जिवनात वावरताना अनेक प्रश्नावर विधायक भूमिका घेण्यासाठी सक्षम बनतील – हा या उपक्रमामागील लोकशाहीच्या सहभागासंबंधीचा गुणात्मक उद्देश आहे. असे असताना –

***महाविद्यालयीन विद्यार्थी संसदेच्या निवडणुका बंद का करण्यात आल्या.?***

***महाविद्यालयीन विद्यार्थीमंडळाच्या निवडणूका बंद का करण्यात आल्या?– त्यासंबंधीची कारणमीमांसाः–***

१. नव्वदच्या दशका पासून विद्यार्थीमंडळाच्या निवडणूकांमध्ये विद्यार्थी संघटनांच्या कार्यामध्ये राजकीय पक्षाकडून मोठया प्रमाणात हस्तक्षेप होवून, त्यांच्याकडून या संघटनांच्या शक्तीचा गैरवापर होवू लागला. परिणामी विद्यार्थी संघटना, चळवळ या राजकारण्यांच्या बटीक बनल्या.
२. महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थीमंडळांच्या निवडणुकामध्ये हितसंबंधीत धनिक आणि राजकीय पक्ष आपल्या स्वार्थासाठी पैसा व दबावतंत्राचा वापर करु लागले. परिणामी खून, मारामाऱ्या, दहशत अशा अशैक्षणिक वातावरणात या निवडणूका गाजू लागल्या. त्यामुळे शिस्त, शांतता, अध्ययन–अध्यापन या शैक्षणिक प्रक्रियेला दुय्यम स्थान प्राप्त झाले. अशा परिस्थितीत विद्यार्थी मंडळाच्या कार्यप्रणालीतून नेतृत्व निर्माण होण्याएवजी गुंडाच्या फौजा निर्माण होवू लागल्या. याचा परिणाम म्हणजे अनेक महाविद्यालयातील विद्यापिठातील वातावरण टवाळखोरांच्या उच्छेदामुळे असुरक्षित बनले आणि याचा खरा त्रास सर्वमान्य विद्यार्थी वर्गाला होवू लागला.
३. या परिस्थितीत विद्यार्थ्यांचे प्रश्न शैक्षणिक समस्या, व्यक्तिमत्व विकास आणि नागरिक घडविण्याची एक शैक्षणिक प्रक्रिया इ. मुद्दयांकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले.
४. वरीलप्रमाणे निर्माण झालेल्या परिस्थितीत विद्यार्थी संसद आणि विद्यार्थी संघटना व चळवळी यांच्यातील अंतर वाढत गेले. म्हणून ही परिस्थिती बदलण्यासाठी आणि या निवडणुका मधील गुन्हेगारी, गुंडगिरी आणि हिंसाचार रोखण्यासाठी १९९७ पासून विद्यार्थी संसदेच्या थेट निवडणुका बंद करण्यात आल्या.
५. अनेक शिक्षणसंस्थांमधून परप्रांतीय विद्यार्थ्यांना प्रवेश देणे सुरु झाल्यानंतर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले विद्यार्थी महाविद्यालयीन निवडणुक प्रक्रियेत सहभागी झाल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. या प्रश्नाने महाविद्यालयीन व विद्यापीठ प्रशासनाची डोके दु:खी वाढली. यातूनच सरकारवर दबाव पडू लागल्यावर, या निवडणूकावर बंदी घालण्याचा निर्णय शासनाने घेतला.
६. विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका म्हणजे युवा विद्यार्थांना लोकशाही प्रक्रियेचे शिक्षण देणे, त्यांच्या नेतृत्व विकासाला योग्य प्रकारे संधी देणे, असा उद्दात्त हेतू होता. पण हया निवडणूका आपल्या निश्चित व नियोजित उद्देशापासून दूर जावून हिंसाचार, गुंडगिरी, दहशत, पैशाचा गैरवापर, जात–धर्म यांचा स्वार्थी हेतूने वापर कसा करावा, यांचे प्रशिक्षण देणाऱ्या कार्यशाळा ठरल्या.

७. वरील सर्व गैरप्रकार विद्यापीठ व शहरातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांतून होत होते असे नाही, तर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील महाविद्यालयातूनही हिंसाचार, साधनांचा गैरवापर, विद्यार्थ्यांची पळवापळवी, मारामाऱ्या या सारखे अनेक हिंसक मार्ग वापरण्यात येवू लागले इत्यादी अनेक कारणामुळे विद्यार्थी संसदेच्या थेट निवडणुकांवर बंदी घालण्यात आली.

३. महाविद्यालयीन विद्यार्थी संसदेच्या थेट निवडणुका बंद झाल्यामुळे त्याचा परिणाम पुढील प्रमाणे झालेला जाणवतो:

१. महाविद्यालय व विद्यापीठ विद्यार्थीमंडळाच्या निवडणुका बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यांतूनच नेतृत्त्व विकसित होण्याची प्रक्रिया बंद झाली. सर्वसामान्य विद्यार्थ्यासाठी कार्यकर्ता व नेता बनण्याचा हा जो मार्ग होता तो बंद झाला. नेतृत्व निर्मितीचा प्रवाहच बंद पडल्यामुळे तरुणाच्या मनात निराशा निर्माण झालेली दिसून येते.

२. विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यातून राजकीय पक्षाला कार्यकर्ते मिळवून देणारी प्रक्रियाच बंद झाल्यामूळे, सर्वच राजकीय पक्षांना त्यांची स्थानिक पातळीवरील
कार्ये करण्यासाठी कार्यकर्ते मिळेनासे झाले आहेत. परिणामी विद्यार्थी संघटनांमधील पक्षांचा व राजकारण्यांचाही रस संपलेला जाणवतो. (अर्थात स्वार्थासाठी अधून—मधून राजकीय पक्ष या संघटनांचा आपल्या इच्छेप्रमाणे वापर करताना दिसतात.)

३. विद्यार्थी मंडळाच्या थेट निवडणुका बंद झाल्यामुळे निवडणुकांचे राजकारण थांबल्यामुळे विद्यार्थी संघटनांचे अस्तित्वही हळूहळू संपुष्टात आले आहे.

४. महाविद्यालये व विद्यापीठे यांच्या धोरणावर व कामकाजावर आणि त्यांनी स्विकारावयाच्या प्रश्नासंबंधी विधायक भूमीका घेवून काम करणाऱ्या विद्यार्थी संघटना निष्प्रभ ठरल्या आहेत.

५. या परिस्थितीत विद्यार्थी संघटना म्हणजे गुणात्मक कार्यांची वैचारिक बैठक हरवलेले विद्यार्थ्यांचे टोळके असेच चित्र दिसून येते.

६. काही राजकीय पक्षाशी संबंधीत विद्यार्थी संघटना आजही अस्तित्वात असल्या तरी त्या केवळ तात्कालीक स्वरुपाचे प्रश्न आणि प्रवेश प्रक्रिया एवढया मर्यादित क्षेत्रातच कार्यरत असलेल्या दिसून येतात.

७. वैद्यकीय, अभियांत्रिक व रोजगाराभिमुख अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी लाखो रुपये घेऊनही संस्थाचालक विद्यार्थ्यांना मुलभूत सुविधा देत नाहीत. शैक्षणिक प्रक्रिया दर्जाहीन बनलेली आहे. पण शासनाच्या आशिर्वादाने शिक्षण सम्राटांची दुकानदारी मात्र जोरदार सुरु आहे. डोनेशनच्या माध्यमातून पदव्यांची व नोकऱ्यांची खिरापत वाटली जात आहे. या संपूर्ण अशैक्षणिक वातावरणात माणूस घडविणारे शैक्षणिक धोरण मात्र हरवलेले आहे.

वास्तविक नेमक्या याच परिस्थितीत केवळ विद्यार्थ्यांचे हित जपणाऱ्या, माणूस घडवणारे शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या, सहज व सवलतीच्या फी मध्ये सर्व विद्याशांखांचे प्रवेश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थीसंघटना व विद्यार्थीमंडळे यांची आवश्यकता असताना त्यांच्या निर्मितीची प्रक्रियाच थांबविण्यात आली. त्यामुळे श्रीमंतांच्या व राजकीय पुढाऱ्यांच्या विनाअनुदानीत शिक्षणसंस्थांची दुकानदारी कायदेशीर ठरुन, ती जोरदारपणे सुरु झालेली आहे. (शिवाय राजकीय क्षेत्रातील नेतृत्वाच्या नवीन भरतीसाठी लोकशाहीतील घराणेशाही आहेचकी)

### *आजच्या परिस्थितीत विद्यार्थी मंडळांच्या थेट निवडणुका सुरु करण्याची कारणे:*

१. स्थानिक स्वराज्य संस्थेपासून ते विधानसभा—लोकसभा या स्तरावरील निवडणुकांसाठी तयार कार्यकर्ते राजकीय पक्षांना मिळावेत म्हणून विद्यार्थी मंडळांच्या निवडणुका पुन्हा सुरु करण्यात आल्याची जोरदार चर्चा वृत्तपत्रे व वृत्तवाहीन्या यांच्या माध्यमातून झालेली आहे.

२. गेल्या काही वर्षांपासून राजकीय पक्षांना युवा कार्यकर्त्यांची उणीव भासू लागली आहे. पैसे दिल्याशिवाय पक्षाचे काम करायला कार्येकर्ते मिळत नाहीत, असा सर्वच राजकीय पक्षांचा अनुभव आहे. निवडणुका जवळ आल्या की, ही उणीव तिव्रतेने जाणवते.

३. युवकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळावी.

४. महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना लोकशाही शासनव्यवस्था व लोकशाहीसमाज जिवनाची ओळख व्हावी, त्यासाठी आवश्यक
ते वर्तन परिवर्तनाचे त्यांना प्रशिक्षण मिळावे व त्यांच्यात लोकशाहीची मूल्ये रुजावित, म्हणून या निवडणुका साधन ठरतील.

५. नवीन कार्येकर्ते मिळविण्यासाठी आणि नव्या पिठीतील युवा नेतृत्व पुढे यावे यासाठी महाविद्यालयीन निवडणुका उपयुक्त ठरतील असे शासनाला व राजकीय पक्षांना वाटते.

६. विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांना आपले प्रश्न प्रशासनासमोर मांडण्यासाठी आणि ते प्रश्न लोकशाही पध्दतीने, अहिंसेच्या मार्गाने सोडविण्यासाठी कसे प्रयत्न करावेत, याबाबतचे प्रशिक्षण देण्यासाठी या निवडणुका उपयुक्त ठरतील.

७. विद्यार्थ्यांच्या हितासाठी, शैक्षणिक प्रगतीसाठी उपयुक्त असे शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम आयोजित करण्यासाठी विद्यार्थी प्रतिनिधींचे मंडळ अत्यंत आवश्यक आहे.

८. महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक आणि प्रशासनाकडून अन्याय व गैरप्रकार होत असतील तर त्या विरुध्द आवाज उठविण्यासाठी व प्रशासनावर अकुंश ठेवण्यासाठी विद्यार्थी प्रतिनिधीमंडळ असलेच पाहिजे.

९.आजच्या परिस्थितीत शिक्षणातील व्यापारीवृत्ती, पैशाचा बाजार, प्रभाव, युवकांची बेरोजगारी, यासारखे अनेक प्रश्न लोकशाही पध्दतीने सोडविण्यासाठी विद्यार्थी संसद, विद्यार्थी संघटना असणे आवश्यक ठरते.

महाविद्यालयीन विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका पुन्हा सुरु करण्यासंबंधी वरील प्रमाणे जी अनेक मते मांडलेली आहेत. त्या सर्व मतांचा विचार करता महाविद्यालयाने विद्यार्थ्यीमंडळाच्या

निवडणुका पुन्हा सुरु का केल्या जात आहेत, याबाबतची जाणीव होते आणि त्या आधारे या अनुषंगाने एक दृष्टिकोन तयार होतो, तो म्हणजे विद्यार्थीमंडळाच्या थेट निवडणुका झाल्याच पाहिजेत. पण पुन्हा मनात असा विचार येतो की, या निवडणुकांना नव्वदीच्या दशकातील निवडणुकांचे स्वरुप येईल की काय? पण असे होवू द्यावयाचे नाही हे निश्चित करुनच शासनाने या निवडणुका पुन्हा सुरु करण्याचा निर्णय घेतला पाहिजे. या निर्णयानुसार खरोखरच या निवडणुका म्हणजे सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हितकारक ठरेल असे शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यास मदत करणाऱ्या, विद्यार्थ्यी मंडळाची व युवा नेतृत्वाची लोकशाही मुल्ये रुजविणारी गरज पुर्ण करणाऱ्या असतील, तर या निवडणुका म्हणजे युवा विद्यार्थी नेतृत्वासाठी आणि भविष्यकालीन भारतीय राजकारणातील सुसंवादी व गुणात्मक नेतृत्वाची गरज भागविणारे एक माध्यम ठरतील.

वरील प्रमाणे लोकशाहीच्या दृष्टीने गुणात्मक परिस्थिती निर्माण होण्यासाठी महाविद्यालयीन व विद्यापिठीय विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका लिंगडोह समितीच्या शिफारशीनुसार घ्याव्या लागतील आणि त्या शिफारशीतील तरतुदीनुसारच निवडणुक प्रक्रियेची अमंलबजावणी करावी लागेल. असाच दृष्टीकोण माझ्या सारख्या अनेक अभ्यासकांचा असल्याचे जाणवते.

लिंगडोह समितीने विद्यार्थीमंडळाच्या निवडणुकांची अमंलबजावणी करण्यासाठी पुढील प्रमाणे सर्वसाधारण शिफारशी केलेल्या आहेत.

### *लिंगडोह समितीच्या शिफारशी:*

१ .वर्गात ७५: उपस्थिती असलेला विद्यार्थीच निवडणुक लढवू शकेल.

२ .उमेदवारांचा निवडणुक खर्च हा पाच हजार रुपयांपेक्षा जास्त असू नये निवडणुक होताच उमेदवारानी आपल्या खर्चाचा अंकेक्षित हिशोब सादर करावा.

३ .उमेदवारांना 'राजकीय पक्षाचा पैसा' वापरण्यास बंदी आहे, आयोगाने निश्चित केलेल्या रक्कमेपेक्षा त्या उमेदवाराने जास्त खर्च केला असेल, तर उमेदवाराची निवडणुक रद्द होईल.

४.जात, धर्म, भाषेवर आधारित द्वेष पसरविला जाणार नाही, वैयक्तिक टिका टाळावी.
५.या सर्व निवडणुकीत गैरप्रकार झाल्यास त्या विद्यार्थ्यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्राचार्यांना अधिकार असेल.
६.उमेदवारांनी विद्यापीठ किंवा महाविद्यालयाची संपत्ती नष्ट करु नये.
७.कोणत्याही राजकीय पक्षांचा या निवडणुकीत हस्तक्षेप असू नये. याची प्राचार्यांनी काळजी घेतली पाहिजे.
८.प्रत्येक महाविद्यालयात नियमित प्राचार्य व आवश्यक तेवढे नियमित प्राध्यापक असावेत.
९.निवडणुका संचलित करण्यासाठी सुरक्षित असा परिसर, आवश्यक तेवढे पोलिसांचे संरक्षण, निवडणुका घेण्यासाठी पुरेसे प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी असावेत.
१०.निवडणुक विषयक सर्व तक्रारींची दखल घेणारा एक तक्रार निवारण कक्ष असणे आवश्यक आहे.
११.निवडणुकांचा संपूर्ण कार्यक्रम हा दहा दिवसात संपायला हवा.
१२.लोकसभा व अन्य निवडणुकांसाठी जशी अचारसंहिता असते आणि निवडणुकीच्या दिवशी पाळावयाचे नियम असतात, तसे सर्व नियम महाविद्यालयीन निवडणुकीतही पाळले जावेत.
१३. महाविद्यालयीन विद्यार्थीमंडळाच्या निवडणुका घेण्यासाठी राज्यपातळीवर स्वतंत्र निवडणुक आयोग असावे. अशा अनेक सूचना लिंगडोह समितीने केलेल्या आहेत.

### *निष्कर्ष:*

"महाविद्यालयीन विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका — एक अभ्यासविषयक दृष्टिकोन" या अनुषंगाने वरील प्रमाणे करण्यात आलेल्या मांडणीतून निष्कर्ष रुपाने सांगावयाचे असेल तर, मला स्वत:ला असे वाटते की — "महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थी मंडळाच्या निवडणुका झाल्याच पाहिजेत". कारण
१.वयाची अठरा वर्ष पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्त्री—पुरुष भारतीय नागरिकाला मतदानाचा अधिकार आहे. म्हणजेच या अवस्थेपासून तो राजकीय दृष्टया जागरुक आहे, राजकीय सहभागासाठी पात्र आहे. असे असताना केवळ महाविद्यालयातील निवडणुका बंद केल्यामुळे तो राजकारणापासून दूर राहील अशी आपेक्षा करणे चूकीचे आहे. उलट त्याला ही संधी नाकारल्यामुळे विद्यार्थी कल्याणाच्या परिक्षेत्राच्या बाहेर जावून म्हणजेच राजकीय पक्षांच्या व गटांच्या हितसंबंधी राजकारणात मिसळून त्याची भारताचा चांगला नागरिक होण्याची संधी तो घालवेल.
२.निवडणुका झाल्याच पाहिजेत असे म्हणत असताना त्या निवडणुकांचा आधार म्हणजेच लिंगडोह समितीने केलेल्या शिफारशी आणि वेळोवेळी गरजेनुसार संसदेने केलेले कायदे, नियम यानुसार केवळ विद्यार्थी व समाजकल्याणाच्या चौकटीतच त्या झाल्या पाहिजेत. जर असे झाले नाही तर, मात्र लोकशाहीतील प्रशिक्षण व सहभाग या नावाखाली गावातील ग्रामपंचायतीचे आपण जे वाटोळे केलेले आहे. त्या पेक्षा वेगळे चित्र विद्यार्थी मंडळ, महाविद्यालय व विद्यापीठातील विद्यार्थी मंडळाच्या राजकारणाचे असणार नाही.
३.लोकशाही, निवडणुका या बाबतच्या ज्या काही किमान शर्ती आहेत. त्यापैकी मुलभूत शर्त म्हणजे नागरीकांची किमान बौध्दिक पात्रता ही होय. या बौध्दिक पात्रतेच्या आधारे राजकीय सहभाग करुन विद्यार्थी कल्याणा बरोबरच भविष्यातील वाटचालीमध्ये समाजाचे व देशाचे कल्याण कसे करावे याचे प्रशिक्षण विद्यार्थी वर्गाला यामाध्यमातून देता येईल.
४.महाविद्यालयीन विद्यार्थी मंडळाच्या निवडणुकामध्ये हिंसा, दंगल, गोंधळ, मारामारी होते — परिणामी कायदा—सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. तसेच पैशाचा व इतरही साधनांचा गैरवापर होतो. म्हणून या निवडणुका बंद करण्यात आल्या असे याबाबतीत समर्थन केले जाते. अर्थात हे एक वास्तव म्हणून स्विकारले तरी याच्याही पुढे एक प्रश्न निर्माण होतो आणि तो म्हणजे ग्रामपंचायतीपासून ते लोकसभेपर्यंतच्या सर्वच सार्वत्रिक निवडणुकांत वरती नोंदवलेले सर्वच प्रकार सर्रास होतात. शिवाय याही पेक्षा भ्रष्टाचार, गैरव्यवहार, फसवणूक, खून व आणखी बरेच काही—म्हणून या परिस्थितीत असा निर्णय घेऊन या सर्वच निवडणुका बंद करावयाच्या का?— या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच दयावे लागेल कारण होय, असे म्हंटले तर लोकशाही व्यवस्था नाकारतोय असे होईल. तेंव्हा याच संदर्भाने महाविद्यालयीन विद्यार्थी मंडळाच्या निवडणुकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे.

### *संदर्भ सूची*

१.लोकसत्ता — रविवार, ७ जुलै २०१३.
२.सकाळ — संप्तरंग — रविवार, ४ ऑगस्ट २०१३.
३.दिव्य मराठी — सोलापूर — सोमवार, ५ ऑगस्ट २०१३.
४.तरुण भारत — आसमंत — रविवार, ११ ऑगस्ट २०१३.



**अशोक नागप्पा उपासे**

प्रमुख,राज्यशास्त्र विभाग कमंवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,पंढरपूर

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net